**Historicity Research Journal** **Impact Factor : 0.4521 (UIF)**
**ISSN : 2393-8900** **Volume - 2 | Issue - 12 | August – 2016**

# "सोलापूर जिल्ह्यातील मंदिर वास्तुकला"

**प्रा सदाशिव रामचंद्र देवकर**
सहाय्यक प्राध्यापक , प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती विभाग , दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.




**प्रस्तावना :-**

सोलापूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण दिशेला असून $17^{0}10$ व $8^{0}32$ उत्तर अक्षांस आणि $74^{0}72$ आणि $76^{0}75$ रेखांशावर वसलेला आहे. हा जिल्हा डेक्कन ट्रॅपच्या आग्रेय दिशेला आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 14,021 चौ.किमी असून सोलापूर जिल्ह्याचा विस्तार पुर्व पश्चिम 200 किमी तर दक्षिणोत्तर लांबी 150 कि.मी. आहे. सोलापूर जिल्ह्याच्या दक्षिणेला विजापूर, आग्रेयला गुलबर्गा, नैऋत्यला सांगली, पश्चिमेला सातारा, वायव्येस पुणे, उत्तरेस अहमदनगर आणि इशान्येस उस्मानाबाद हे जिल्हे आहेत.[1]

सोलापूर जिल्ह्यात, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, मोहोळ, माढा, माळशिरस, अक्कलकोट, बार्शी, पंढरपूर, सांगोला, करमाळा हे अकरा तालुके आहेत.[2]

सोलापूरचा इतिहास प्राचीन असून प्राचीन काळीन त्याचा कुंतल देशात समावेश होत होता. सोलापूर जिल्ह्याच्या प्रदेशावर अनुक्रमे सातवाहन, बदामीचे चालुक्य, मानखेटचे राष्ट्रकुट, कल्याणचे चालुक्य, मंगळवेढाचे कलचुरी, अक्कलकोटचे शिलाहार व देवगीरीचे यादव राजघराण्यांनी क्रमशा राज्य केले. पण अपुरा पाणीपुरवठा, खनिज संपती आणि पर्वतीय रांगाचा अभाव या प्रतिकुल भौगोलीक परिस्थीतीमुळे सोलापूरला राजधानीचा मान कधीही मिळाला नाही. असे असले तरी या राजघराण्यातील राजांनी तसेच त्यांच्या प्रधानांनी व इतर अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील निरनिराळ्या मंदिरांना दिलेले दान पत्रे शिला लेखाच्या रुपाने उपलब्ध आहेत.[3]

मंदिर संपन्न अशा या जिल्ह्यात वेगवेगळ्या कालखंडात बांधलेली वेगवेगळी मंदिरे आहेत. हे सर्व मंदिर वास्तुकलेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. त्याच प्रमाणे याजिल्ह्यातील मुर्ती या मुर्तीकलेच्या अभ्यासाच्या दृष्टीने उल्लेखनिय आहेत. तसेच सोलापूर जिल्ह्यात वीरगळ सतीस्तंभ, जुनेवाडे, वेस, बुरुज, किल्ले, राजवाडे, बारव, शिलालेख इत्यादी पुरातत्त्वीय अवशेष सोलापूर जिल्ह्यातील प्राचीन कला वैभवाची साक्ष देतात.[4]

सोलापूर जिल्ह्यातील मंदिर वास्तुकला ही हेमाडपंती शैलीतील आहेत हेमाडपंती हे विशेषण या मंदिरांचे मध्ययुगीन मंदिरापासून असलेले वेगळेपण स्पष्ट करण्यासाठी होतो. हेमाडपंती देवळात दगडांचे चिरे एकमेकांवर अगर एकमेकात विशिष्ट पध्दतीने बसवून चुनाच्या सहाय्याशिवाय बांधलेली दिसतात. त्रिकोण, चतुष्कोन, काटकोन, वर्तुळ, अर्धवर्तुळ आकारांचे दगडांचे चिरे बसवून ते एकमेकात इतके कुशलतेने बसविलेले आहेत की, त्यामुळे इमारतीच्या व एक भागास आधार मिळून त्यावर इमारतीचे छत बिनधोक राहू शकते. या अखेरीच सभा मंडपाचे वेगळे स्तंभ ऊभारण्यात येवून. शिवाय त्यावरील दर एक कोपऱ्यात चार स्तंभ उभारण्यात येऊन चौकोन साधून उभारलेले आहेत.[5] सोलापूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिराची उभारणी अशा प्रकारची आढळून येते. डॉ. प्रभाकर देव यांनी टेम्पल ऑफ मराठवाडा या ग्रंथात अशा हेमाडपंती मंदिराची चर्चा केली आहे.[6] महाराष्ट्र शासनाच्या नवीन गॅझेटिअर मध्ये आतापर्यंतच्या विदवानांनी केलेल्या मंदिर स्थापत्याचा आढावा घेतलेला आहे.[7] डॉ. गो.ब. देगलूरकर यांच्यामते ललाटी गणेश हे यादवकालीन मंदिराचे वैशिष्ट्ये तसेच मंदिराच्या स्तंभावरील नागफंद व शीर्षस्थानी किचक यादव कालीन मंदिर स्तंभांचे वैशिष्ट्ये सोलापूर जिल्ह्यातील बऱ्याच मंदिरात आढळून येते.[8] तसेच वास्तुशैलीच्या दृष्टिने पाहता त्यातील बहुसंख्य मंदिरे नागरशैलीत विशेषत: पश्चिम भारतातील माळव्यात प्रचलीत असणाऱ्या भूमिजा या उपशैलीत बांधलेले आहेत. जिल्ह्यातील मंदिराची बांधनी चतुरस्त्र व नक्षत्राकृती अशा दोन प्रकारचे आराखडे वापरलेले आहेत. क्वचित चौथरे वापरले आहेत. परंतु पाया खांदलेला दिसत नाही. बांधनीत दगड सांधण्यासाठी चुना, सिमेंट अशा प्रकारचा कोणताही तत्सम पदार्थ वापरलेला दिसत नाही. दगडांना खाचा पाडून एकावर दगड रचून भिंतीची बांधनी केली आहे. पिठावर अश्वथर, गजथर, नरथर असे क्वचित आढळतात. स्तंभ एकसंध, एकजात गुळगुळीत कातलेले आहेत. तसेच मंदिराचे शिखरे इतर मंदिरापेक्षा वैशिष्टे पूर्ण असून शिखरांची घडण आणि मंदिराच्या पायाची आखणी यात फार मोठा समतोल साधला आहे. तसेच मंदिराचे वितांन अलंकृत आहेत. वितांनाप्रमाणेच मंदिराच्या द्वारशाखा कोरीव कामाने सुशोभित केलेल्या आहेत आणि त्यावरील गणेश पट्टी व त्यावरील भागात मातृका मुर्ती इतर देव देवता कोरलेल्या आढळतात. ऊंबरस्यावर किर्तीमुख मकर व कमळ ह्या प्रतिमा प्रामुख्याने कोरलेल्या आढळतात.[9] जिल्ह्यातील मंदिर वास्तुकलेवर मुख्यत: चालुक्य शैलीचा प्रभाव पडलेला आहे.[10] तर कांही मंदिर यादव कालीन हेमाडपंती शैलीतील आहेत. येथील मंदिरावर महाराष्ट्रात इतर ठिकाणी आढळणाऱ्या मंदिरवास्तुकलेचा प्रभाव पडलेला दिसून येतो.[11]

सोलापूर जिल्ह्याचा नकाशा ठेवला असता एक गोष्ट आपल्याला लक्षात येते की, भीमा, सिना, निरा या नद्यांच्या खोऱ्यात मुख्यत: मंदिरे आढळतात. म्हणजेच अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ, माळशिरस, मंगळवेढा या तालुक्यात बरेचसे मंदिरे आहेत. यामध्ये सोलापूरचे कपीलसध्दि मल्लिकार्जुन मंदिर, जेऊरचे काशिविश्वेश्वर, नातेपुते येथिल महादेव मंदिर, त्याचप्रमाणे कंदलगांव निंबर्गी, भंडारकवठे, मंद्रुप, कळमन, कुरुल, चपळगांव, मोहोळ, वाफळे, बिटले, हिवरे, शिवणी, बीबी दारफळ, मार्डी, सोहाळे, सौंदणे, जांभगांव, इत्यादी ठिकाणी उत्कृष्ट मंदिरे आहेत.[12]

सोलापूर जिल्ह्यातील मंदिरे ही मंदिर वास्तु कलेच्या दृष्टिने वैशिष्ट्येपुर्ण आहेत. या मंदिरांचा पाया अधिक चिन्हावरती आखलेला आहे. पायाची आखणी ज्या आकाराचे आहे नेमकी त्याच आकाराच्या आगदी लहान आकृती शिखरावरील आम्लकाची बैठक आहे. प्रमुख दिशांना कोनेतील असा चौरस कल्पून एका कोनासमोर प्रवेशद्वाराची व्यवस्था केलेल्या या इमारतींच्या पायाची आखणी अनेक कोनबध्द अशी केली आहे. या पायावर उभ्या केलेल्या भिंतीनी जे

कोन बनवतात त्या सर्व कोनांच्या रेषा जमीनीपासून निघून थेट कळसापर्यंत उभ्या गेलेल्या दिसतात. आणि त्या शिखराच्याच छोट्या-छोट्या प्रतिकृती खालपासून वर पर्यंत एकीवर एक प्रमाणशिर बसविल्यामुळे हे सर्व लहान-लहान शिखरे रचून मोठे-मोठे शिखर तयार केल्या सारखे वाटते. शिखराच्या या सर्व प्रतीकृती जागच्या जागी मजबूत राहव्यात म्हणून उपयोगात आणलेल्या मध्यल्या दगडावर लक्षी काम केल्याने एकंदर शिखराला चांगलाच उठाव दिसतो. मंदिराच्या कोनाकृती भिंती पायापासून वरपर्यंत चढत गेल्यामुळे त्या अगोदरच ठासीव दिसतात आणि छायाप्रकाशाच्या परिणामामुळे त्यांच्या भरीवपणाला अधिक उठाव मिळतो. तळापासून कळसापर्यंत गेलेल्या भिंती कोनांच्या रेषामुळे भासनारा बांधनीचा उभटपणा वेगवेगळ्या थरांच्या आडवाटीनी कमी झाल्यासारखे वाटतो. या थरात विविध आकार आणि प्रकार असून त्यात अस्वथर, गजथर, नरथर, कणी इत्यादी प्रकार प्रामुख्याने वापरलेले दिसतात. दोन मोठ्या थरांच्या मध्यभागी योजना केलेल्या कर्णीच्या दगडाचा आकार दुधारी, सुरीच्या पात्याचा आडवा छेद घेतल्या सारख्या वाटतात.[13]

### मंदिराचा कालखंड :

इ.सनाच्या 9 व्या किंवा 10 व्या शतकापासून ते 13 व्या शतकाच्या शेवटपर्यंतचा काळ हा हिंदू जैन काळ मानला जातो. महाराष्ट्रात या वेळी कल्याणी चालुक्य, शिलाहार व यादव या प्रमुख घराण्यांची सत्ता होती. स्वाभावीकच या घराण्यातील राज कर्त्यांनी जिल्ह्यातील मंदिर वास्तु कलेला प्रोत्साहन दिलेले दिसून येते.

### निष्कर्ष :

सोलापूर जिल्ह्याती मंदिर वास्तुकलेवर चालुक्य शैलीचा प्रभाव पडलेला दिसून येतो तर कांही मंदिर यादव कालीन हेमांडपंती शैलीतील आहेत. जिल्ह्यातील मंदिरांचे तीन भागात विभाजन झालेले आहेत. यामध्ये चालुक्य कालीन मंदिरे यादव कालीन मंदिरे व यादवोत्तर काळातील मंदिरांचा समावेश होतो. इ.सनाच्या 9 व्या किंवा 10 व्या शतकापासून ते 13 व्या शतकाच्या शेवटपर्यंच्या काळात महाराष्ट्रात कल्याणी चालुक्य, शिलाहार व यादव या घराण्याचे जिल्ह्यावर सत्ता होती. स्वाभावीकच या घराण्यातील राज्य कर्त्यांनी येथील मंदिर वास्तुकलेला प्रोत्साहन दिलेले दिसून येते. जिल्ह्यातील मंदिरांचे कांही वैशिष्ट्ये म्हणजे मंदिरांची बांधणी आयताकृती व नक्षत्राकृती अशा दोन प्रकारचे आराखडे वापरलेले आहेत. मंदिराच्या कोनाकृती भिंती पायापासून वरपर्यंत चढत गेल्यामुळे त्या ठासीव दिसतात. आणि छायाप्रकाशाच्या परिणामामुळे त्यांच्या भरिवपणाला अधिक उठाव मिळालेला दिसून येतो. जिल्ह्यात मोजकी मंदिरे सोडले तर इतर मंदिरांना शिखर दिसत नाहीत.

### संदर्भ ग्रंथ सुचि


| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | कुंटे बी.जी. | : | Solapur Dist. Gazetteer Bombay 1977 | पृष्ठ क्र. 1 |
| 2 | कित्ता | : | | पृष्ठ क्र.2 |
| 3 | देशपांडे प्र. न. (संपादक) | : | संशोधक इतिहासाचार्य वि.का. राजवाडे, संशोधन मंडळाचे त्रैमासीक, धुळे, मार्च 1998 | पृष्ठ क्र. 25 |
| 4 | देवकर स. रा. | : | सोलापूर जिल्ह्यातील प्राचीन सांस्कृतिक आणि पुरातत्त्वीय कलावैभव-सोलापूर, 2010 | पृष्ठ क्र. 15-16 |
| 5 | डॉ. पाठक अरुनचंद्र | : | महाराष्ट्र गॅझेटिअर इतिहास प्राचीन कालखंडात एक भाग दोन, पुणे - 2002 | पृष्ठ क्र. 159 |
| 6 | खरे ग.ह., कुलकर्णी गो.त्र्यं., चिटणीस कृ. ना. (संपादीत) | : | भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे.-1984 | पृष्ठ क्र. 231 |
| 7 | डॉ. देव प्रभाकर | : | The Temple of Marathwada - Jaypur -1973 | पृष्ठ क्र. 22-23 |
| 8 | उपरोक्त डॉ. पाठक अरुणचंद्र | : | | पृष्ठ क्र. 137-141 |
| 9 | डॉ. देगलूकर गो. ब. | : | दुर्गम दुर्ग देवगीरी (किल्ले दौलताबाद) मुंबई 1999 | पृष्ठ क्र. 17 |
| 10 | उपरोक्त खरे ग. ह. कुलकर्णी गो. त्र्यं., चिटणीस कृ.ना. (संपादीत) | : | | पृष्ठ क्र. 234-233 |
| 11 | Cusens, Henry | : | Mediaeval Temple of Dakhan New Delhi - 1995 | पृष्ठ क्र. 63-64 |
| 12 | डॉ. नूलकर सत्यव्रत | : | Archaeology of Solapur of District. Unpublished Ph.D. Thesis Aurangabad -1996 | पृष्ठ क्र. 187 |
| 13 | प्रा. भिडे ग. ल. (संपादीत) | : | शोध निबंध संग्रह शिवाजी विद्यापीठ इतिहास प्राध्यापक परिषद चौथे व पाचवे अधिवेशन-1998 | पृष्ठ क्र. 32-33 |